आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार दिनांक १० जून २०२५
ठळक बातम्या

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार गतीशील आणि निर्णयक्षम सरकार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.
- महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्यासंबंधीचं विधेयक विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात मांडलं जाणार.
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर, तीन हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे करणार लोकार्पण.
- भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी आयसीसीच्या हॉल ऑफ फेममधे विराजमान.

आता सविस्तर बातम्या .......

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार गतीशील आणि निर्णयक्षम सरकार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते मुंबई इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. मोदी सरकारने देशातला भ्रष्टाचार संपवत विकास आणि सर्वसमावेशकतेच्या आधारे सरकार चालवलं असं मुख्यमंत्री म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या विकासकामांचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने एका वर्षात ३० लाख घरं देण्याचा विक्रम केला, ८१ कोटी लोकांना मोफत अन्नधान्य, १५ कोटी घरांना नळजोडणी, १२ कोटी घरांमधे शौचालय दिलं असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**११ वर्ष–पर्यावरण**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं, भारतानं गेल्या दशकात, उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज श्रोत्यांसाठी, गेल्या अकरा वर्षात, प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख-मालिका सादर करत आहे. त्यात आज, पर्यावरण विषयक प्रगतीवर आधारित हे वृत्त, देत आहेत, वृत्त विभागातून हेमांगी कुळकर्णी........

*"गेल्या दशकात, देशानं पर्यावरण संरक्षण आणि समावेशक विकासाची सांगड घालणारे संयुक्तिक मॉडेल स्वीकारलं आहे. नद्यांच्या पुनरुज्जीवनापासून ते परिसंस्था पुनर्संचयित करण्यापर्यंत आणि हरित पायाभूत सुविधा निर्माण करण्यापर्यंत, देशानं पर्यावरण संवर्धनासाठी दृढ वचनबद्धता दर्शविली आहे. नमामि गंगे हा जगातील सर्वात मोठ्या नदी पुनरुज्जीवन कार्यक्रमांपैकी एक आहे. त्याने पाण्याची गुणवत्ता सुधारली आहे, जैवविविधता वाढवली आहे आणि गंगेच्या पुनरुज्जीवनात स्थानिक सहभागाला प्रोत्साहन दिलं आहे. यासोबतच, स्वच्छ भारत मोहीम आणि गोबरधन योजनेनं स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनात बदल घडवून आणला आहे, विशेषतः ग्रामीण भागात. गोबरधन योजनेअंतर्गत सेंद्रिय कचऱ्याचं बायोगॅस आणि खतात रूपांतर करण्यात येतं, त्यामुळं स्वच्छता आणि ऊर्जा आत्मनिर्भरता दोन्ही बाबी साध्य होतात. "एक पेड माँ के नाम" यासारख्या मोहिमांनी नागरिकांना पर्यावरणीय कृतीसाठी एकत्रित आणले आहे. देशभरात १४२ कोटींहून अधिक झाडं लावण्यात आली आहेत. भारतानं वन्यजीव संवर्धनातही लक्षणीय प्रगती केली आहे. प्रोजेक्ट चित्ता, प्रोजेक्ट लायन आणि विस्तारित प्रोजेक्ट टायगर या उपक्रमातून अधिवास विकास आणि प्रजाती पुनर्प्राप्तीवर लक्ष केंद्रित केले आहे. भारतात सध्या किमान ३,६८२ वाघ आहेत, जे जगातील वाघांच्या ७५ टक्क्यांहून अधिक आहेत. देशात सध्या ९१ रामसर स्थळं आहेत, जी आशियातील सर्वाधिक आहेत. १३ सागरी किनाऱ्यांना मानाचं ब्लू फ्लॅग प्रमाणपत्र मिळालं आहे. तर अमृत धरोहर आणि मिश्तीया सारख्या योजना पाणथळ जागा आणि खारफुटींच्या संवर्धनाला चालना देत आहेत."*

**मंत्रिमंडळ निर्णय**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्यासंबंधी विधेयक आगामी विधिमंडळ अधिवेशनात आणण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ६हजार २५० रुपयांची वाढ, पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची वाढ, तसंच बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ८ हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला. राज्यातील शासकीय भौतिकोपचार (फिजीओथेरपी) व्यवसायोपचार (ऑक्युपेशनल थेरपी) पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याचा आणि बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन सुरू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या उपायांना आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**सर्वपक्षीय शिष्टमंडळ**

ऑपरेशन सिंदूर बाबत जगभरातल्या महत्त्वाच्या देशांना भेटी देऊन भारताची भूमिका मांडणाऱ्या सर्वपक्षीय शिष्टमंडळांमधल्या सदस्यांची आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भेट घेणार आहेत. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्या कार्यालयानं आज संध्याकाळी सात वाजता प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानी ही भेट होणार असल्याचं कळवलं आहे. दरम्यान, शशी थरुर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाचं आज मायदेशी आगमन होणार आहे.

**मुख्यमंत्री अकोला दौरा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या ११ जून रोजी अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून यावेळी तीन हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात येणार आहे. तसेच कार्यकर्ता संवाद संमेलनाच्या माध्यमातून जनतेशी ते थेट संवाद साधणार आहेत. हा कार्यक्रम अकोला शहरातील क्रिकेट क्लब मैदानावर गुरुवारी ११ जून रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे. अकोला पूर्व, अकोट आणि मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघातील अनेक महत्त्वाच्या विकास प्रकल्पांचा शुभारंभ होणार आहे. या पाठोपाठ गुरुवार १२ जून रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार अकोला दौऱ्यावर येत आहेत. अजित पवार यांच्या उपस्थितीत शहरातील काही राजकीय पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेश केला जाणार आहे. त्यानंतर ते दुपारी बुलढाणा जिल्ह्यातील खामगावकडे रवाना होतील.

**मोतीबिंदू जनजागृती**

मोतीबिंदू जनजागृती मोहिमेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यातल्या ग्रामीण रुग्णालयात नेत्र तपासणी करण्यात येत आहे. मधुमेह तसंच डोळ्यांचे आजार असलेल्या रुग्णांनी वेळोवेळी नेत्र तपासणी करून घ्यावी असा सल्ला आरोग्य अधिकारी डॉ.अमोल जांभुळकर यांनी दिला आहे.

*तरी हा जो जून महिना आहे हा मोतीयाबिंदू अवेअरनेस मन्थ म्हणून साजरा करतो आहे की मोतीयाबिंदू काय असतो म्हणजे कशामुळे होतो काय होते आम्हाला रुग्णांना सांगायचं आहे. मोस्टली काळजी असं घ्यायला पाहिजे की तुम्हाला जर तुमची वय 40 च्या वयाच्यानंतर झालेला तर रेग्युलर आई चेकअप करायला पाहिजे. पहिली गोष्ट आणि जे बोर्ड सर्टिफाय डॉक्टर असतात त्यांच्याकडेचं करायला पाहिजे ना की कोणत्याही असं जे काही चष्म्याचे दुकान असता शॉप असतात तिथे जाऊन न चेक करता. डोळ्याची जे स्पेशल डॉक्टर*

*असतात. त्यांच्याकडून जाऊन चेक केलेलं बेटर असते. दुसरी गोष्ट जेव्हा तुम्ही वयाच्या 40व्या वयात क्रॉस करता, तर प्रत्येक1-1 वर्षामध्ये डोळ्याचं चेकअप व्हायला पाहिजे.*

## हॉल ऑफ फेम

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद-आयसीसीनं क्रिकेटपटू महेंद्रसिंह धोनीला आयसीसीच्या प्रतिष्ठेच्या हॉल ऑफ फेम मध्ये समाविष्ट केलं आहे. या वर्षी हा सन्मान मिळवणा-या सात खेळाडूंमध्ये धोनीचा समावेश आहे. कठीण परिस्थितीत असामान्य नेतृत्व करण्याची क्षमता आणि खेळातलं अद्भुत कौशल्य यासाठी धोनीची निवड या सन्मानासाठी केल्याचं आयसीसीनं म्हटलं आहे. आयसीसीच्या हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट होणं, ही आपल्यासाठी सन्मानाची बाब असल्याची प्रतिक्रिया महेंद्रसिंह धोनीनं दिली आहे.

## NADP

राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी अर्थात NADP पदव्युत्तर बिजनेस मॅनेजमेंट डिप्लोमा कार्यक्रमात, कॅप्सटन प्रकल्पांवर काम करण्याची संधी देऊ करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत भारताच्या संरक्षण आधुनिकीकरण आणि आत्मनिर्भर भारत ध्येयाशी सुसंगत नवोपक्रम आणि कृतींमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. या प्रकल्पांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संरक्षण तंत्रज्ञान समाविष्ट असून याचा उपयोग नाईट विजन सिस्टम्स आणि मुख्य बॅटल टँक्सच्या धोरणात्मक मूल्यांकनात होणार आहे अशी माहिती आज राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी इथं आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. हा एक वर्षाचा संशोधन आधारित अभ्यासक्रम असून युडॉक्सिया रिसर्च युनिव्हर्सिटीशी संलग्न आहे. यानंतर 100% रोजगार हमी आणि इंटर्नशिपच्या संधी देण्यात येणार आहे.

## बालमजुरी

बालमजुरी ही एक अनिष्ठ प्रथा असून ती सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समस्यांशी निगडीत असल्यामुळे या प्रथेविरुध्द विस्तृत प्रमाणात जनजागृतीसाठी दरवर्षी 12 जून हा दिवस जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिवस म्हणून देशभर पाळला जातो. भंडारा जिल्ह्यातील सर्व दुकाने, आस्थापना धारक, उद्योजक, बांधकाम नियोक्ते/विटभट्टी व इतर आस्थापना मालकांनी बाल व किशोरवयीन कामगारांना कामावर ठेऊ नये. बाल कामगार आढळून आल्यास या कार्यालयाशी संपर्क साधवा, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त यांनी केले आहे.

**नागपूर भाजप**

केंद्र शासनाचे 11 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून नागपूरात भाजपतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून विविध चौकसभा जनसंवाद सभा यातून केंद्र राज्य शासनाच्या योजना जनमानसांपर्यंत पोहचवल्या जातील. या उपक्रमाअंतर्गत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी 12 जून रोजी पत्र परिषदेला संबोधित करतील. 11वर्षाच्या लेखाजोखा लोकांसमोर मांडण्यासाठी शहरव्यापी डिजीटल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून यात रील, व्हॉल्ग, फोटो यातून सरकारचे यश दाखवण्यात येणार असून स्पर्धच्या विजेत्यांना रोख पारितोषिकही देण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेत नागपूर शहर आणि जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते.

*****